# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

## केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका करणार विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विकसित भारत संकल्प यात्रेचे आयोजन (Phase-२) सुरू आहे. याअनुषंगाने दिनांक 09 डिसेंबर 2023 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बुद्धविहार येथे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली ऑनलाईन कॉन्फरन्स द्वारे संवाद आयोजित करण्यात आला होता. यासाठी मिरा भाईंदर शहरात मा. श्री. पियूष गोयल, केंद्रीय मंत्री, मा. श्री. चंद्रकांत दादा पाटील, मंत्री, महाराष्ट्र शासन, मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश अध्यक्ष, मा. आमदार श्रीमती गीता जैन, मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) उपस्थित होते.

सदर यात्रेकरिता आपल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लोकसंख्येच्या प्रमाणात विविध कॅम्प चे आयोजन करायचे आहे. त्यानुसार मिरा भाईंदर शहरात देखील विविध कॅम्पचे आयोजन करण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या महत्वाच्या योजना जसे की उज्वला, PMAY, PM-SWANIDHI, आयुषमान भारत, आधार इत्यादीची माहिती सामान्य जनतेपर्यंत पोहचवणे तसेच यामध्ये अधिकाधिक लोकांचा सहभाग प्राप्त करून घेणे हे या कॅम्पचे आयोजन करण्याचे महत्वाचे उद्देश आहेत. या कॅम्पच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेर्यंत पोहचवणे तसेच सध्याच्या लाभार्थी यांच्याशी संवाद साधणे, त्यांचे अनुभव प्राप्त करून घेणे इत्यादी उपक्रम राबविण्यात येणार आहे. शासकिय कामानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका एकूण ३३ ठिकाणी विकसित भारत संकल्प यात्रेचा कार्यक्रम घेणार आहे. विकसित भारत संकल्प यात्रा यशस्वी करण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र राज्याचा अधिकाधिक सहभाग शासनास अपेक्षित आहे. त्यामुळे सदर कार्यक्रम अधिक मोठ्या प्रमाणात राबविण्याच्या दृष्टीने तसेच केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने अधिक कॅम्पचे आयोजन करण्यात येणार आहे.